# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ३८

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार दि. १५/१२/२०१६** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### उत्पन्नाचा आढावा

**विषय क्र. १८५४**

स्थानिक संस्था कर कार्यालयाकडील सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोबर २०१६ अखेर व्यापाऱ्यांची नोंदणी व जमा झालेले उत्पन्न याबाबत मा. सह महापालिका आयुक्त, स्थानिक संस्था कर यांचे जा.क्र. स्थासंक/६१७२ दि.१/१२/२०१६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १८५५**

मा.सौ.सुष्मा निम्हण व मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी यांचे दि.८/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. १० ब पाषाण स्मशानभूमी येथे व रामनदी येथे रिटेनिंग वॉल बांधणेसाठी र.रुपये ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, प्रभाग क्र. १० ब मध्ये विठ्ठलनगर विविध ठिकाणी जुन्या ड्रेनेज लाईन बदलून मोठया व्यासाची लाईन टाकणे (झेड १६बी१०२/एसडी२-३३) | ३० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. १० ब पाषाण स्मशानभूमी येथे व रामनदी येथे रिटेनिंग वॉल बांधणे | --- | ३० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

### मागील सभेचे विषय

**विषय क्र. १८५६**

Construction and Demolition (C&D) waste Processing and Management Plant at Identified Location/s कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ निविदाधारकांपैकी सर्वात कमी दर देणारे ठेकेदार मे.एस.ऐ.इन्फ्रा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/५०४ दि.८/९/२०१६ चे पत्र.

१. मे.एस.ऐ इन्फ्रा यांना बांधकाम राडारोडावर प्रक्रिया करणेस र.रू.१९५ प्रति मे.टन टिपींग फी अदा करणेस व त्यामध्ये दर वर्षी ५% दरवाढ करणेस.
२. मौजे वाघोली, ता.हवेली येथील गट नं. १२९/२ मधील सरकारी खाणीची जागा क्षेत्र सुमारे ० हेक्टर ८० आर लीव अॅण्ड लायसेन्स/ लीज अॅग्रीमेंटने भाडयाने १५ वर्षासाठी भाडेकराराने देणेस व त्याठिकाणी प्रकल्प धारक यांचेकडून स्वखर्चाने प्रकल्प उभारणी करणेस.
३. मौजे वाघोली, ता.हवेली येथील गट नं. १२९/२ मधील सरकारी खाणीची जागा यशस्वी निविदाधारकास हस्तांतरण होईपर्यंत यशस्वी निविदाधारकाच्या स्वतःच्या जागेवर म्हणजेच मौजे वाघोली, गट नं. २२९/२ या ठिकाणी प्रकल्प विना मोबदला राबविणेस व पुणे महानगरपालिकेची जागा मिळाल्यानंतर त्याचा वापर सदर प्रकल्पाच्या इतर कामासाठी करणेस.
४. प्रकल्प उभारणी व चालविणेसाठी आवश्यक त्या सर्व मान्यता संबंधित अॅथॉरिटी कडून प्रकल्प धारकांने पुणे महानगरपालिका यांचे वतीने घेणेस.

५. प्रकल्प धारकाकडून परफॉरमन्स बँक गॅरंटी म्हणून १.२५ कोटीची (बयाना रक्कम धरून) बँक गॅरंटी स्विकारणेस.
६. निविदा अटी शर्ती नुसार प्रकल्पधारकास स्पेशल पर्पज व्हेईकल स्थापन करणेस व त्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.
७. पुणे महानगरपालिके मार्फत बांधकाम राडारोडा प्रकल्पापर्यंत वाहतुक करणेस.
८. ६ महिने प्रकल्प उभारणीस व १५ वर्ष प्रकल्प चालविणे, देखभाल दुरुस्ती करणे तद्नंतर प्रकल्प आहे त्या परिस्थितीत पुणे महानगरपालिकेस हस्तांतरण करणेस
९. प्रकल्पापर्यंत अॅप्रोच रस्ता करणे, पाणीपुरवठा व विद्युतविषयक कामे करणेबाबत वेळोवेळी आवश्यक ते निर्णय घेणेसाठी मा.महापालिका आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस
१०.काही अपरिहार्य कारणास्तव प्रस्तावित केलेल्या जागेवर प्रकल्प उभारणीसाठी अडचणी उदभवल्यास प्रस्तुत प्रकल्पासाठी जागा बदल करणेचे अधिकार पर्यायी उपलब्ध जागेनुसार त्या क्षमतेच्या प्रकल्प राबविणे आणि आवश्यकता म्हणून आवश्यक मे.टन क्षमतेचे प्रकल्प एकापेक्षा अधिक जागेवर उभारणी करण्याचे अधिकार प्रकरणी आवश्यक तो करारनामा करणेस व त्यातील कलमे ठरविण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८५७**

रस्त्यावरील टी जंक्शनचा विकास व सुधारणा व वाहनतळ निर्माण करणे भाग–३ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.प्रविण कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९८,६७६/– पेक्षा २७.२७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७२,७२,०३७=०५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीवरील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व त्याकरीता त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/८१७ दि. २९/११/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/१२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८५८**

रस्त्यावरील टी जंक्शनचा विकास व सुधारणा व वाहनतळ निर्माण करणे भाग–१ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.प्रविण कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९८,६७६/– पेक्षा २७.२७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७२,७२,०३७=०५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीवरील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व त्याकरीता त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/८२० दि. २९/११/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/१२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८५९**

Carrying out refurbishment(civil & Electromechanical ) & O & M work for the period of five years at 3 TPD Biomethanation plant (to process segretated organic Bio degreadable municipal solid wastes)installed at Ghole road pune या कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे.मेलहेम इंजिनिअर्स प्रा.लि. यांचे आवश्यक्तेनुसार १. Civil work चा खर्च र.रू. २१,४३,८७५/– २. Electromechanical work चा खर्च र.रु.८,७०,६१०/– व ३. Operation & maintainence work चा खर्च र.रु.४२,७३,५७०/– असे एकूण खर्च र.रु.७२,८८,०५५/– सर्व करांसहित त्यांचेकडून काम करुन घेणेस व त्यांचेशी त्यापोटी करार करण्यास व त्यानुसार रक्कम अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/ घनकचरा /७१६,दि.१५/१०/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/१२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८६०**

मा.अविनाश बागवे व मा.अॅड्.रामचंद्र उर्फ चंदुशेठ कदम यांचे दि.४/१०/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. २५ ब मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक, पान क्र. १९८, नवीन सिग्नल बसविणे व जुने सिग्नल दुरुस्त करणे, यादी क्र. एसटी३, सीई२०बी१०४/एसटी३–२, पुणे शहरातील वाहतुक शिस्तीसाठी ट्रॅफिक चॅनेलायझिंग, झेब्रा क्रॉसिंग, डिव्हायडर, सिग्नल सिंक्रोनायझेशन इत्यादी तदनुषंगिक कामे करणे | ५० लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. २५ ब मध्ये विविध विकास कामे करणे | ––– | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/१२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८६१**

मे. महाराष्ट्र शासनाच्या नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण–२०१५ अंतर्गत पुणे शहरातील माहिती तंत्रज्ञान कंपन्यांना (जकात) स्थानिक संस्था करातून माफी देणेबाबत मे. राज्य शासनाने मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भ क्रमांक ७ मधील शासन निर्णय क्रमांक आयटीपी–२०१३/(प्र. क्र. २६५)/ उद्योग–२, दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ नुसार माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना जकात/प्रवेशकर/एलबीटी यामधून सूट देण्याबाबत 'नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०१५' जाहीर केले असून त्या धोरणानुसार माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना स्थानिक संस्था करामधून सूट देण्याबाबत मे. राज्य शासनाकडून वारंवार विचारणा होत असल्याने माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना स्थानिक संस्था करामधून सूट देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/स्थासंक/६५८ दि. ७/१०/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/१२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८६२**

पुणे शहरातील पादचारी क्रॉसिंगचा पूरेपूर वापर होणेसाठी व तो न होणेची कारणे जाणून घेणेसाठी '' द वॉक स्मार्ट अॅवॉर्ड '' स्पर्धा आयोजित करणेस तसेच या स्पर्धेत पुणे शहरातील विविध आर्किटेक्चरल महाविद्यालये व सल्लागार संस्था यांना सहभागी करून घेणेस व उत्तम डिझाईनचे सादरीकरण करणाऱ्या स्पर्धकांस प्रथम , द्वितीय, तृतीय व दोन उत्तेजनार्थ बक्षिसे देणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/६७० दि.१३/१०/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/१२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८६३**

पुणे शहर शून्य कचरा प्रणाली प्रकल्प २० प्रभागांमध्ये राबविण्यासाठी मे.जनवाणी संस्था यांनी दाखल केलेल्या स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्तावानुसार त्यांचेकडून एकूण २० प्रभागांसाठी र.रुपये १,६३,५०,०००/– (अक्षरी एक कोटी त्रेसष्ट लाख पन्नास हजार फक्त) या रकमेपर्यंत काम करुन घेणेस व मे.जनवाणी संस्थे समवेत सामंजस्य करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/६७२ दि.१३/१०/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/१२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८६४**

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाकडील सन २०१६ –१७ चे 'क ' अंदाजपत्रकातील महसूली भांडवली कामातील शिल्लक रक्कमेतून अनुक्रमे र. रू. ११९०=०० लक्ष व र. रू. ७००=०० लक्ष असे एकुण र. रू. १८९०=०० वर्गीकरणाने उपलब्ध करून मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त ( वि ) यांचे जा. क्र. मआ/पापुवमलनि/७०२, दि. १५/१०/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/१२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८६५**

स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे महानगरपालिकेचा १०० कोटी इतका हिस्सा 'पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड' यांना अदा करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उआ(वि)/७४५ दि.५/११/२०१६ चे पत्र.

१)मे.केंद्र शासनाच्या आदेशाप्रमाणे वित्तीय वर्ष सन २०१५–१६ व सन २०१६–१७ या दोन वर्षासाठी र.रुपये १०० कोटी इतकी रक्कम खालील अर्थशिर्षकावरुन 'पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड' ला अदा करणेस

अर्थशिर्षक आरई६४अे१०१, यावरती ज.ने.रा.श.पु.अ., अमृत व स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत मनपाचा हिस्सा, तरतुद र.रुपये १,१७,९७,३१,७००/-

२) 'पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड' यांचे नावे धनादेश/धनाकर्ष काढणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/१२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८६६**

श्री.कुणाल कुमार, भा.प्र.से. महापालिका आयुक्त दि. १५ ते १७ नोव्हेंबर २०१६ या कालावधीत बार्सिलोना, स्पेन येथे आयोजित केलेल्या "Make in India Pavilion-Smart Expo World Congress-Conference & Exhibition 2016" या कार्यशाळेस उपस्थित राहत असल्याबाबतची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उआ/साप्र/७५२ दि.१५/११/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/१२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. १८६७**

३ डिसेंबर हा जागतिक अपंगदिन म्हणून जगभर साजरा केला जातो. जागतिक अपंग दिनानिमित्त पुणे महानगरपालिकेच्या वतीने अपंग व्यक्तिंच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणा-या एका संस्थेचा अथवा एका व्यक्तिचा रक्कम रुपये १,११,१११/-चा पुरस्कार तसेच शाल व पुष्पगुच्छ देवून दरवर्षी सत्कार करणेत यावा. या करिता पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात दरवर्षी रक्कम रुपय ५ लाखाची तरतूद करणेत यावी. आणि सदर पुरस्कारासाठी पुरस्कार निवड समिती गठीत करणेत यावी.

३ डिसेंबर २०१६ चे अपंग दिनानिमित्तचे पुरस्कारासाठी लागणारा खर्च सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रकातील १. मुख्य देखरेख, वसुली वगैरे क. महानगरपालिका व स्थायी समिती, १. नगरसचिव यांचे कार्यालय बजेट कोड RE11A-276 सत्कार, अभिनंदन, पुरस्कार, बक्षिसे यासारखे कार्यक्रम साजरे करणे या तरतूदीमधून रक्कम रुपये ५ लाखांपर्यंत खर्च करणेत यावेत याबाबत मा.शंकर केमसे, सभागृह नेता व मा.सौ.सुषमा निम्हण यांचे दि. २९/११/२०१६ चे पत्रावर झालेला मा.पक्षनेते सभा दि. ७/१२/२०१६ चा निर्णय विचारासाठी.

**विषय क्र. १८६८**

पुणे महानगरपालिकेच्या वतीने प्रसिध्द कथ्थक कलाकार व नृत्य दिग्दर्शिका स्व. पंडित रोहिणी भाटे यांच्या नावाचा पुरस्कार प्रतिवर्षी देण्यात येतो.

स्व. पंडित रोहिणी भाटे पुरस्काराअंतर्गत कथ्थक क्षेत्रातील ज्येष्ठ कलाकारास मुख्य पुरस्कार व इतर सहाय्यक व उदयोन्मुख कलाकारांना इतर ५ पुरस्कार देवून गौरविण्यात येते. सन २०१६ चा स्व. पंडित रोहिणी भाटे मुख्य पुरस्कार भरत नाट्यम नृत्य क्षेत्रात सातत्याने कार्यरत असणाऱ्या ज्येष्ठ कलावंत मा. सौ. रोशन दात्ये ( कथ्थक नृत्य गुरू ) यांना प्रदान करण्यात आला त्यांना रोख रक्कम रूपये ५०,०००/- तसेच इतर सहकलाकारांना रक्कम रूपये १०,०००/- असे पुरस्कार देण्यात आले आहे .

पुणे महानगरपालिकेतर्फे यापूर्वी स्व. पंडित रोहिणी भाटे मुख्य पुरस्कार मुख्य पुरस्कारासाठी रक्कम रूपये ५०,०००/- ( रक्कम रूपये पन्नास हजार फक्त ) व इतर पुरस्कारांसाठी र.रू. १०,०००/- ( दहा हजार फक्त ) देण्यात येत होते. परंतु सन २०१७ पासून सदर पुरस्काराचे रक्कमेत वाढ करून मुख्य पुरस्कार र.रू. १,११,१११/- करण्यात आला आहे. इतर सहकलाकाराच्या मानधनामध्ये बदल न करता र.रू. १०,०००/- इतकी रक्कम प्रत्येकी देण्यात यावी याबाबत मा.दत्तात्रय धनकवडे व मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे यांचे दि. ७/१२/२०१६ चे पत्रावर झालेला मा.पक्षनेते सभा दि. ७/१२/२०१६ चा निर्णय विचारासाठी.

**विषय क्र. १८६९**

आमच्या ममता फाऊंडेशन (अमर बुडूक) या संस्थेने सामाजिक जन जागृती होण्यासाठी सिग्नल एक दिशा या नावाचा लघुपटाची निर्मिती केली आहे. सदरचा लघुपट हा अत्यंत वास्तव अशा स्थितीचे प्रतिनिधीत्व करत आहे. जबाबदारी सरकारची आहे. आपल्याला काही देणे घेणे नाही या प्रवृत्तीचा बिमोड करणारा आणि सिग्नलवर थांबून भिक मागणे किंवा वस्तुंची विक्री करणाऱ्या बालकांना योग्य वेळेत शालेय शिक्षण मिळाले पाहिजे. त्यांचे योग्य पध्दतीने संगोपन झाले पाहिजे. हा या लघुपटाचा मुख्य विषय आहे. सदरचा लघुपट बनविण्यासाठी आर्थिक खर्च फार झालेला आहे. सदरचा लघुपट हा सामाजिक प्रश्नांची उकल करण्यास व विचार मंथन होण्यासाठी प्रभावी माध्यम ठरत आहे. लघुपटास वर्तमानपत्र तसेच इतर माध्यमांनी हा अत्यंत स्थुप्त व परिणामकारक उपक्रम म्हणून गौरव करुन फार मोठी प्रसिध्दी दिली आहे. केवळ सामाजिक हित समोर ठेवून लघुपटाची संकल्पना व निर्मिती केलेली आहे यामध्ये कोणताही आर्थिक विषय नाही.

संस्था गेली ८ वर्षे एच.आय.व्ही.ग्रस्त अनाथ मुलांचा सांभाळ करत आहे. तरी अनेक सामाजिक उपक्रम राबवित असून त्याचाच एक भाग म्हणून सदरच्या लघुपटाची निर्मीती केली आहे.

तरी सदरच्या लघुपटास पुणे मनपा कडून रक्कम रुपये १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) पर्यंत आर्थिक सहाय्य करण्यात यावे याबाबत मा.दत्तात्रय धनकवडे यांचे दि. ७/१२/२०१६ चे पत्रावर झालेला मा.पक्षनेते सभा दि. ७/१२/२०१६ चा निर्णय विचारासाठी.

**विषय क्र. १८७०**

श्री छत्रपती शिवाजी महाराज आग्र्याहून सुटून राजगडावर सुखरूप आले तो स्मृती दिन पुणे महानगरपालिका व श्री शिवाजी राजगड स्मारक मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने किल्ले राजगडावर गेली २५ वर्षाहून अधिक काळ साजरा होत होता. महानगरपालिकेचे कार्यक्रम हे टेंडर काढून करावे असे ठरल्यामुळे गेली ३-४ वर्षे हा स्मृती दिन साजरा होऊ शकला नाही त्यामुळे शिवप्रेमींमध्ये नाराजी आहे.

श्री शिवाजी राजगड मंडळ, पुणे ही संस्था रजिस्टर्ड संस्था आहे. ही संस्था व पुणे महानगरपालिकेच्या वतीने पूर्वी प्रतिवर्षी या अनुशंगाने विविध कार्यक्रम आयोजित केले जायचे, त्यामध्ये गड चढण्याची स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, मांडव, ध्वनी क्षेपण व्यवस्था, निवासी व्यवस्था, पाहुण्यांचे चहा- भोजन व्यवस्था, पुष्पहार, पुष्पगुच्छ, छायाचित्रे काढणे, गडावरील मिरवणूकीसाठी गडावर सामान नेणे-आणणेची व्यवस्था करणे, सामान वाहतूक खर्च, विद्युत व्यवस्था व इतर विविध अनुषंगिक कामे करण्यात येत होती. टेंडर पध्दतीमध्ये काही त्रुटी राहून कार्यक्रम चांगल्या प्रकारे पार पडण्याची शक्यता कमी असल्याचे अनेकांचे मत आहे. पुणे महानगरपालिका आपल्या अंदाजपत्रकामध्ये प्रतिवर्षी २ लाख रूपयांची तरतूद करत असते.

तरी पूर्वीप्रमाणे सदरचा स्मृती दिन पुणे महानगरपालिका व श्री शिवाजी राजगड स्मारक मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राजगडावर प्रतिवर्षी साजरा करण्यात यावा व अंदाजपत्रकीय तरतूदीपर्यंत खर्चाची बिले त्याची खातरजमा करून अदा करण्यात यावीत. हा कार्यक्रम महानगरपालिका हद्दीबाहेर असल्यामुळे महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ अन्वये यास मान्यता घेण्यात यावी याबाबत मा.गणेश बिडकर यांचे दि. ७/१२/२०१६ चे पत्रावर झालेला मा.पक्षनेते सभा दि. ७/१२/२०१६ चा निर्णय विचारासाठी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**